**संदर्भ** : १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम, २४४ व २४५.
२. महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२.
३. आदेश - जा.क्र./जावप/कक्ष-१/५२९/२०२१, दि.२५/१०/२०२१.
४. महाराष्ट्र महानगरपालिका, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:याचिका-३०१७ / प्र.क्र.१३० / नवि-२२, दि. १४ नोव्हेंबर, २०२२.
५. मा. पोलीस आयुक्त यांचेकडील अधिसूचना क्र. कक्ष-१०/विशा/पो.बॅ.हो.फ./अधिसूचना/२८००/२०२१, दि.१७/०९/२०२१.
६. सह आयुक्त, नगरपरिषद संचालनालय, नवी मुंबई यांचेकडील पत्र-जा.क्र.नप्रसं/का-०६ / २०२४ / जहिया-१५५/२०११/८६८५, दि.२०/१२/२०२४.
७. उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिकरोड यांचा दि.०५/०२/२०२५ रोजीचा अभिप्राय.

---

नाशिक महानगरपालिका, नाशिक
जा.क्र./जापवि/कक्ष-१/ ९४५/२०२५
दिनांक : २३/ ०५ /२०२५.
NMC/DTD/OWL/२०२५/

**आदेश**

**विषय** : मनपा मालकीच्या खुल्या जागेंवर तात्पुरता स्वरुपात जाहिरात शुभेच्छा फलक प्रसिध्दीकरिता जागा निश्चिती करणेबाबत..

राज्यातील अनधिकृत जाहिराती / होर्डींग यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, जिल्हाधिकारी यांच्या क्षेत्रातील आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी व्यापक स्वरुपाचे आदेश मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१५५/२०११ या प्रकरणी दि.३१/०१/२०१७ रोजी दिलेले आहेत. मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१५५/२०११ व इतर याचिकांच्या अनुषंगाने सुनावणी सुरु असून, मा.न्यायालयाने सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपालिका व नगरपंचायती यांना त्यांच्या क्षेत्रामध्ये होर्डिंग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स लावण्यासाठी जागा निश्चित करण्याबाबत, जाहिराती / होर्डिंग्स इत्यादींबाबत दररोज दिल्या जाणाऱ्या परवानग्यांची माहिती संबंधित पोलिसांना उपलब्ध करून देण्याबाबत व प्रत्येक बॅनर / होर्डिंग इत्यादींवर अर्जदाराचे नाव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा **QR कोड** लावण्याबाबत सूचित केले आहे.

त्याअनुषंगाने, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नाशिकरोड विभागात शुभेच्छा, वाढदिवस, सामाजिक, शैक्षणिक, राजकिय, धार्मिक व भावपुर्ण श्रध्दांजली इ. कार्यक्रमासाठी आजमितीस मनपा मालकीच्या तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलकांसाठी **एकूण-२१** खुल्या जागा निश्चित करण्यात आलेल्या असून, संदर्भ क्र. २, ४ व ६ अन्वये आजपावेतो नाशिक शहराचा विस्तार / मागणी लक्षात घेता पुर्वीच्या निश्चित केलेल्या **एकूण-२१** खुल्या जागा कायम ठेऊन, नव्याने सुचविण्यात आलेल्या **एकूण-२६** खुल्या जागेंना तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक प्रसिध्दीकरिता मंजुरी देणेत येत आहे.

| अ.क्र. | निश्चित करण्यात आलेले जागेचे ठिकाण | संख्या |
|---|---|---|
| १ | मुक्तीधाम कॉर्नर लगत | ०१ |
| २ | शाळा क्र.१२५ मैदानाजवळ | ०१ |
| ३ | शाळा क्र.१२५ कॉर्नर पाण्याच्या टाकी जवळ | ०१ |
| ४ | आनंद नगर तरण तलावरोड | ०१ |
| ५ | सुराणा हॉस्पीटल दत्त मंदिररोड मैदाना लगत | ०१ |
| ६ | जय भवानीरोड आर्टीलरी सेंटररोड खोले मळा | ०१ |
| ७ | जय भवानी रोड तुळजा भवानी माता मंदिर लगत | ०१ |
| ८ | तरण तलाव कॉर्नर बिटको कॉलेज मागे | ०१ |
| ९ | दत्त मंदिर सिग्नल | ०१ |
| १० | बिटको चौक | ०१ |
| ११ | छत्रपती शिवाजी महाराज चौक | ०१ |
| १२ | सैलानी बाबा चौक | ०१ |
| १३ | प्रेस गेट समोर | ०१ |
| १४ | के एन केला इंग्लिश स्कुल जवळ | ०१ |
| १५ | एकलेहरा रोड कॉर्नर | ०१ |
| १६ | आई माऊली चौक चेहडी पंपीग | ०१ |
| १७ | भगवान चौक चेहडी पंपीग | ०१ |
| १८ | चेहडी जकात नाका | ०१ |
| १९ | तानाजी मालुसरे मैदान चेहडी | ०१ |
| २० | हॉली फ्लॉवर इंग्लिश स्कुल कॉर्नर | ०१ |
| २१ | निसर्गोपचार केंद्र कॉर्नर लगत गार्डन जवळ | ०१ |
| २२ | शिखरेवाडी पुर्व | ०१ |
| २३ | शिखरेवाडी पश्चिम | ०१ |
| २४ | बिटको कॉलेज बस स्टँड जवळ | ०१ |
| २५ | कन्या कोठारी शाळा कॉर्नर | ०१ |
| २६ | नाशिकरोड पोलिस विभागीय आयुक्त कार्यालय | ०१ |
| **एकूण** | | **२६** |

उक्त नमूद मनपा मालकीच्या तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक प्रसिध्दीकरिता निश्चित करण्यात आलेल्या खुल्या जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ७९, २४४ व २४५ व महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: याचिका-३०१७/प्र.क्र.१३०/नवि-२२, दि. १४ नोव्हेंबर, २०२२ अन्वये नाशिकरोड विभागातील पुर्वीच्या निश्चित करण्यात आलेल्या **एकूण-२१** व नव्या निश्चित करण्यात आलेल्या **एकूण-२६** अशा **एकूण-४७** खुल्या जागांना तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलक प्रसिध्दीकरिता संदर्भ क्र.५ चे अधिसूचने अन्वये जाहिरात फलकास परवानगी देणे पुर्वी पोलीस

विभागाकडून जाहिरातीचा मसुदा प्रमाणित करुन तात्पुरता स्वरुपातील निश्चित करण्यात आलेल्या जागेंवर **QR कोडसह** परवानगी देतांना खालील अटी-शर्ती लागु राहातील.

१. तात्पुरता स्वरुपातील जाहिरात शुभेच्छा फलकांना नियमोचित परवानगी देण्याची कार्यवाही विभागीय अधिकारी, नाशिकरोड यांची राहील.

२. तात्पुरता स्वरुपातील जाहिरात परवानगीकरिता अर्ज, सर्वसाधारण विहित अशा संस्करण फी सह विहित नमुन्यात (नमुना-क) अन्वये महानगरपालिकेने विनिर्दिष्ट केलेल्या जागांवर तीन दिवसांपेक्षा अधिक नाही व ६ फूट लांबी X ३ फूट उंची किंवा ८ फूट लांबी X ३ फूट उंची किंवा ८ फूट लांबी X ६ फूट उंची पेक्षा अधिक आकाराचे नसलेल्या फलकांनाच परवानगी देण्यात यावी.

३. जाहिरात फलक प्रसिध्दी करणेपुर्वी पोलीस विभागाकडून जाहिरातीचा मसुदा प्रमाणित करून घ्यावा. त्याशिवाय परवानगी देण्यात येऊ नये.

४. सदर जाहिरात फलकासाठी प्रत्येकी उक्त नमूद आकारमानासाठी महानगरपालिकेने निश्चित केलेप्रमाणे प्रती जाहिरात फलक जागा लायसेंन्स फी, त्यावरील वस्तु व सेवाकर १८%, जाहिरात कर व प्रती जाहिरात फलक प्रतिभूती (सुरक्षा अनामत) इतकी सुरक्षा पोटी जमा करण्यात यावी, अर्जदार, कार्य अथवा प्रयोजन पुर्ण झाल्यानंतर लगेचच जाहिरात काढून टाकण्याची व्यवस्था करील, जे अवधी सामान्यत:३ दिवसांपेक्षा अधिक असता कामा नये. तशी माहिती मिळाल्यानंतर, प्रतिभूती (सुरक्षा अनामत) ठेवची रक्कम कोणत्याही शर्तीचा भंग केल्याबद्दल समपहरण केलेली नसेल, तर परत करण्यात यावी.

५. अर्जदाराने तात्पुरता स्वरुपातील प्रत्येक जाहिरात फलकांवर अर्जदाराचे नांव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा **QR कोड** मुद्रांकित करणे बंधनकारक असून, अर्जदारास निश्चित केलेल्या ठिकाणावरच जाहिरात फलक प्रसिध्दी करतील याची दक्षता घेण्यात यावी. **QR कोड** नसलेले निश्चित केलेले जागाव्यतिरिक्त होर्डींग, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इ. आढळून आल्यास सदर जाहिरात फलकांवर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५ मधील मुद्दा क्र. ३ व ५ अन्वये तात्काळ निष्काषित करण्याची कारवाई अनुसरण्यात यावी.

६. सदरचे जाहिरात फलकांवरील जाहिरातीमुळे सभ्यतेचा किंवा नीतिमत्तेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

७. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ आणि महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५ यातील सर्व तरतुदीसह सदरचे अटी-शर्ती लागू राहातील.

Manisha

(मनिषा खत्री भा.प्र.से.)
**आयुक्त तथा प्रशासक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**प्रति : माहितीस्तव-**

**१. मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर, नाशिक.**

२/- सदर आदेशाची अंमलबजावणी बाबतचे निर्देश आपले अधिनिष्ठ संबंधित अधिकारी/कर्मचारी, पोलीस स्टेशन व शहर वाहतुक शाखा, नाशिक शहर, नाशिक. यांना देणेस विनंती.

**३. सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतुक शाखा, नाशिक शहर, नाशिक.**

**प्रत : कार्यवाहीसाठी-**

१. अतिरिक्त आयुक्त (१,२,३) मनपा नाशिक.

२. उपआयुक्त (अति) जाहिरात व परवाने विभाग प्रमुख, मनपा नाशिक.

३. उपआयुक्त (अतिक्रमण) मनपा नाशिक.

४. विभागीय अधिकारी, नाशिकरोड, मनपा नाशिक.

५. जाहिरात व परवाने विभाग, नाशिकरोड, मनपा नाशिक.

६. आदेश फाईल.

७. स्थळप्रत.

**प्रत :**

**१. जनसंपर्क अधिकारी, मनपा नाशिक.**

२/- सदर आदेशातील नव्याने निश्चित केलेल्या जागा नागरिकांचे माहिती करिता प्रसिध्दी देणेत यावी.

**२. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मनपा नाशिक.**

२/- सदर आदेशातील नव्याने निश्चित केलेल्या जागा मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येऊन नियमोचित परवानगी देणेकामी नाशिकरोड विभागातील नागरी सुविधा केंद्रामधील संगणक कार्यप्रणालीमध्ये समाविष्ठ करण्यात याव्यात.